# प्रकरण दुसरे

# राजकीय आरक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व संशोधन पुनर्विलोकन

## २.१) राजकीय आरक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:—

राजकीय आरक्षणाची मिमांसा करत असतांना या आरक्षणाचा इतिहास पाहणे महत्वाचे वाटते कोणत्या गोष्टींमुळे राजकीय आरक्षण व्यवस्था अस्तित्वात आली यासाठी कोणी काय—काय विचार मांडले कोण—कोणते प्रयत्न केले हे पाहण्यासाठी प्रामुख्याने तीन टप्प्यात विचार करता येईल. पहिला टप्पा स्वातंत्र्यपूर्व कालखंड दुसरा टप्पा स्वातंत्र्योत्तर कालखंड आणि तिसरा टप्पा १९९२ नंरतचा कालखंड.

### २.१.१) स्वातंत्र्यपूर्व कालखंड:—

भारतामध्ये आरक्षणाची सुरूवात खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून झाली आहे. या कालखंडात राजर्षि शाहू महाराज, म. फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होतो. भारतामध्ये आरक्षणाची सुरूवात १८८२ च्या हंटर कमीशन पासून झाली. म. ज्योतिबा फुले यांनी सर्वांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व सरकारी नोकऱ्यामध्ये आरक्षणाची मागणी केली. १९०२ मध्ये राजर्षि शाहू महाराजांनी दलितांच्या विकासासाठी कोल्हापूर संस्थानमध्ये दलितांना नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण दिले व आरक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

१९०९ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने ''इंडियन कौन्सिल ॲक्ट'' पास केला. ज्यात स्वतंत्र मतदार संघाची संकल्पना सर्वप्रथम मांडण्यात आली व मुस्लीम आणि शीख यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले.

पुढे १९३२ मध्ये ब्रिटीश पंतप्रधानांनी जातीय निवाडा घोषित केला व त्यानुसार मुस्लिम आणि शीख यांच्याप्रमाणे ख्रिश्चन, युरोपीयन व ॲग्लोइंडियन यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ जाहीर केले त्याचप्रमाणे दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ जाहीर केला. तेव्हा म. गांधी उपोषणाला बसले व पुणे करार घडून आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत यासाठी प्रयत्नशील होते पण म. गांधी उपोषणाला बसले त्यांच्यामते दलित हा हिंदू धर्माचाच एक भाग आहे जर त्यांना स्वतंत्र मतदार संघ दिले तर हिंदू धर्मातील एकता लोप पावेल शेवटी तडजोड करण्यात आली व ७८ जागांऐवजी १४८ राखीव जागा दिल्या मात्र दलितांना स्वतंत्र मतदार संघ गमवावे लागले. हा करार इतिहासात, '१९३२ चा पुणे करार' म्हणून ओळखला जातो. हे आरक्षण धोरण पुढे स्वातंत्र्योत्तर काळात राज्य घटनेत समाविष्ट करून घेतले.

### २.१.२) स्वातंत्र्योत्तर कालखंडः—

पुणे करारामध्ये ठरल्याप्रमाणे राज्यघटनेत दलितांसाठी राखीव जागा देण्यात आल्या या जागा प्रत्येक जनगणनेच्या नुसार लोकसंख्येनुसार वाढत गेल्या. आज या जागा महाराष्ट्र विधानसभेसाठी अनुसूचित जातीच्या २९ जागा आहेत.

१९५३ मध्ये कालेलकर आयोग नेमण्यात आला मागासवर्गीयांची आकडेवारी काढण्यात आली व त्यानुसार १९५६ मध्ये या आयोगाने आपला अहवाल सादर केला . यात SC, ST आणि OBC यांच्यासाठी

सामाजिक आरक्षणाची मागणी केली मात्र त्यावेळी OBC साठीची मागणी नाकारली गेली.

१९७९ मध्ये शैक्षणिक आणि सामाजिक मागासलेपणा मोजण्यासाठी मंडल आयोगाची स्थापना केली तेव्हा OBC ची संख्या ५२ टक्के होती तर २००६ ला ही संख्या ६० टक्के झाली.

एकंदरित हा कालखंड नेहरुजींचा लोककल्याणकारी विकसनशील कालखंड म्हणून ओळखला जातो. यात शासनाची भूमिका लोककल्याणाची होती व त्यामुळे मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार OBC ना सामाजिक आरक्षण प्राप्त झाले.

## २.१.३) १९९२ नंतरचा कालखंड:—

१९९२ च्या नंतर भारताने खाजगीकरण, उदारिकरण, जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार केला यात राज्याची लोककल्याणकारी राज्याची भूमिका मागे पडली. या काळात आरक्षणाचा विषय हा चर्चेचा विषय बनला. नवउदारमतवादी विचारवंत यांनी प्रामुख्याने विरोध केला. पण याच काळामध्ये प्रादेशिक पण अधिक प्रभावीपणे विकसित झाले. उत्तरप्रदेशात B.S.P., महाराष्ट्रात शिवसेना वगैरे यामुळे निर्णय निर्धारण प्रक्रियेत प्रादेशिक पक्षाची भूमिका वाढली.

आरक्षणामुळे न्यायालयाची भूमिकाही महत्वपूर्ण राहिली. १९५१ ला मद्रास राज्य विरूध्द चंपाकम दोराईराजन खटल्याच्या निर्णयामध्ये सांगीतले की, जातीच्या निकषावर असलेले आरक्षण गरजेचे व योग्य आहे. तर

१९६३ ला एम. आर. बालाजी विरूध्द म्हैसूरच्या खटल्यात सामाजिक आरक्षणावर ५० टक्केची मर्यादा टाकली. तर १९९२ मध्ये इंदिरा सहानी केस मध्ये केंद्रशासनाच्या नोकऱ्यात मागासवर्गीयांना आरक्षण मान्य केले. १९९४ मध्ये तामिळनाडू राज्याला बजावण्यात आले की त्यांनी ५० टक्के मर्यादा पाळावी. २००५ मध्ये खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण मान्य केले नाही.

सामाजिक आरक्षणाच्या बाबतीत न्यायालय सक्रिय दिसत असले तरी राजकीय आरक्षणाच्या बाबतीत मात्र राजकीय आरक्षणाच्या बाबतीत कोणतीही सक्रियता दिसत नाही.

## २.२) साहित्य पुनर्विलोकनः—

राजकीय आरक्षण या संशोधन विषयासाठी साहित्य पुनर्विलोकन करत असतांना जाणवले की, राजकीय आरक्षणावर वेगळा विचार करणारे खूप कमी लोक आहेत. यात प्रामुख्याने ॲलिस्टर मॅकमिलन, इष्टर डफ्लो, कांशीराम आणि पन्नालाल सुराणा यांनी प्रामुख्याने लेखन केले आहे. तर उत्तम अंभोरे, श्रावण देवरे, अनंत रा. शी. फडके, मनिष राजकुमार यांनी एकूण सामाजिक आरक्षणावर लेखन केले आहे. त्याचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

### १) ॲलिस्टर मॅकमिलनः—

यांनी त्यांच्या *Standing at the Margins Representation and Electrol Reservation in India* या पुस्तकात भारतातील

आरक्षण व्यवस्थेची विशेषत: राजकीय आरक्षणाची मांडणी करतात. पुस्तकाच्या पहिल्या भागात राजकीय आरक्षणाबद्दलच्या घडामोडी, त्यामागचे राजकारण यांची चर्चा करतात तर दुसऱ्या भागात दलितांच्या आर्थिक विकासाच्या दराचा व राखीव मतदार संघाची मांडणी करतात. दलितांच्या आर्थिक विकासाचे अध्ययन करतांना ते दलितांमधील तीन पिढयांच्या व्यवसाय याचा आधार घेतात त्यासाठी त्यांनी CSDS चा डेटा वापरला आहे. याच प्रकारे मी माझ्या संशोधनामध्ये दलितांचा आर्थिक विकास अभ्यासण्यासाठी पिढयांचा विचार न करता खुला गट व अनुसूचित जाती यांच्यातील उत्पादनाची साधने, शेतजमीनीची मालकी, शासकीय, खाजगी नोकरी यातील प्रमाण यांच्या आधारे दलितांचा आर्थिक विकास अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) ईस्टर डफ्लो:—**

यांनी त्यांच्या *Why Political Reservation* या लेखामध्ये राजकीय आरक्षणाची गरज का आहे याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते सामाजिक आरक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राजकीय आरक्षण गरजेचे आहे. यात त्यांनी महिला आरक्षणाचा अभ्यास केला आहे.

**३) निरंजन शाहू:—**

हे त्यांच्या *Reservation Policy and its Implementation across Domains in India* या पुस्तकामध्ये सामाजिक आरक्षणाचा अभ्यास केला आहे. यात त्यांनी समाजातील सर्व गटाची लोकसंख्या

त्याचा व्यवसाय, बॅकेत काम करणारे कामगार, साक्षरतेचे प्रमाण याचा अभ्यास केला आहे. मी माझ्या संशोधनात आरक्षण आणि आर्थिक विकास यांची सांगड घातली आहे.

**४) कांशीराम:—**

यांनी त्यांच्या *An Era of Stooges* (चमचा युग) या पुस्तकामध्ये राजकीय आरक्षणाबाबत सर्वाधिक चर्चा केली आहे. स्वतंत्र मतदार संघ व राखीव जागा यातील फरक त्यांनी स्पष्ट केला आहे. ज्या पुणे कराराने दलितांचा स्वतंत्र मतदार संघाचा हक्क डावलला व राखीव जागा दिल्या तो पुणे करार हा दलितांचे अहित करणारा कसा होता हे स्पष्ट करतात व त्यांचा धिक्कार करतात.

त्यांच्या मते या राखीव जागांमुळे दलितांच्या मतांचे मुल्य शुन्य झाले आहे. पुस्तकाचा प्रमुख आधार मी माझ्या संशोधानासाठी घेतला आहे व आजच्या काळामध्ये राजकीय आरक्षणामध्ये काय बदल असावा याचे विवेचन केले आहे.

**५) श्रावण देवरे:—**

यांनी ''राखीव जागा आणि आर्थिक निकष'' या लेखावरून सामाजिक आरक्षण आणि आर्थिक निकष यांचे विवेचन केले आहे. त्यांच्यामते फुले, शाहू, आंबेडकर यांनी नोकरशाहीचे अब्राम्हणीकरण करण्यासाठी राखीव जागा हे शस्त्र वापरले यात आर्थिक निकष लावणे म्हणजे विनाआरक्षीत लोकांनी आरक्षित जागा बळकावण्यास वाट मोकळी करणे. म्हणून आर्थिक निकष नसावेत असे प्रतिपादन करतात.

### ६) पन्नालाल सुराणा:—

हे त्यांच्या ''मतदार संघ परिसीमन'' या आलेखात राजकीय आरक्षणाची सविस्तर मांडणी करतात. पुणे करार, स्वतंत्र मतदार संघ आणि राखीव जागा यातील गुंतागुत सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते, आज अनुसूचित जातीच्या महाराष्ट्रामध्ये ज्या २२ च्या २९ जागा झाल्या त्यामागे अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत झालेली वाढ आहे. कारण १९५६ च्या नंतर बाबासाहेबांनी बौध्द धर्माचा स्विकार केल्यानंतर बहुतांश लोकांची जनगणना चालू असतांना बौध्द अशी नोंद केल्याने ही संख्या कमी होती मात्र नंतरच्या काळात सामाजिक व राजकीय फायद्यासाठी यांनी बौध्द ऐवजी SC (अनुसूचित जाती) अशी नोंद करायला सुरूवात केल्याने ही संख्या वाढली आहे.

माझ्या संशोधनात मी यांच्या संशोधनाला दुजोरा न देता यापुढील संशोधन केले आहे.

एकंदरित वरील विचारवंताचे लेखन पाहिल्यास असे दिसते की, राजकीय आरक्षणावर खूप कमी विचारवंतांनी लेखन केले आहे.